
मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 2 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# माजी आमदार विलास लांडे तुतारी फुंकणार

## अजित पवारांना मोठा धक्का : शरद पवारांच्या भेटीनंतर पुत्र विक्रांत लांडे यांच्याकडून शिक्कामोर्तब



**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे भोसरीतील माजी आमदार विलास लांडे तुतारी फुंकणार असल्याचे त्यांचे पुत्र विक्रांत लांडे यांनी अखेर जाहीर केले आहे. आज शरद पवार यांच्या भेटीनंतर विक्रांत लांडेंनी त्यांच्या प्रवेशावर शिक्कामोर्तब झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अजित पवारांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवडमध्ये शरद पवार पुन्हा एक धक्का देणार आहेत.

अजित पवार यांचे समर्थक अजित गव्हाणे यांनी भोसरीतील अनेक माजी नगरसेवकांसह नुकताच शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यावेळी माजी आमदार विलास लांडे यांचा प्रवेश मात्र झाला नव्हता. त्यामुळे विलास लांडे नेमकी काय भूमिका घेणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. दरम्यान काल (दि.३०) विलास लांडे यांनी शरद पवारांची भेट घेतली होती, मात्र या भेटीबाबत कोणतीही प्रतिक्रिया लांडे यांच्याकडून आलेली नव्हती.

आज (दि.०१) अजित गव्हाणे यांच्यासह विलास लांडे यांचे पुत्र विक्रांत लांडे यांनी शरद पवार यांची पुण्यात भेट घेतली आहे. त्याबाबत माहिती देताना विक्रांत लांडे म्हणाले की, आज आम्ही शरद पवार साहेबांची भेट घेतली आहे. भोसरी विधानसभा मतदारसंघाचा आढावा त्यांनी घेतला. विलास लांडे यांचा लवकरच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश होईल. शरद पवार यांनी तारीख दिली की विलास लांडे तुतारी फुंकणार असल्याचे विक्रांत लांडे यांनी ठामपणे सांगितले आहे.

कालच्या प्रमाणेच विलास लांडे यांनी यापूर्वीही अनेकदा शरद पवारांच्या भेटी घेतल्या आहेत. मात्र त्यांनी स्वतःहून घरवापसीच्या प्रवेशावर कधीचं भाष्य केलेले नाही. नेहमी त्यांनी संभ्रमाचं राजकारण खेळलेलं आहे. त्यामुळे जो पर्यंत विलास लांडे हातात तुतारी घेत नाहीत, तोपर्यंत त्यांचा प्रवेश निश्चित कसा मानायचा? अशी चर्चा यानिमित्ताने पुन्हा एकदा शहरात रंगलेली आहे.

# शहरातील खड्डे तात्काळ बुजवा!

## खासदार श्रीरंग बारणे यांची सूचना : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत बैठक



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यावर खड्डेच खड्डे असून दुरवस्था कायम आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असल्याने शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी तीव्र शब्दात अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली. मुख्य चौकासह शहरातील सर्व रस्त्यावरील खड्डे तत्काळ बुजवावेत. कोणत्याही परिस्थितीत वाहतुकीला अडथळा निर्माण झाला नाही पाहिजे. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे निर्देशही खासदार बारणे यांनी दिले.

पिंपरी-चिंचवड शहरातील रस्त्यावरील खड्डे, त्यामुळे होत असलेल्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी खासदार बारणे यांनी मंगळवारी महापालिका अधिका-यांची बैठक घेतली.

खासदार बारणे म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून शहरातील सर्वच भागातील प्रमुख रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त आहेत. रस्त्यावरील खड्डे हे वाहतूक कोंडी होण्याचे मुख्य कारण आहे. खड्ड्यामुळे वाहनांचा वेग संथ होत आहे. आता पावसाळा संपला असून रस्ते तत्काळ खड्डेमुक्त करावेत. डांगे चौकात मोठी वाहतूक कोंडी होते. हिंजवडी आयटी पार्कला जाणारे कर्मचारी डांगे चौकातून जातात. कर्मचाऱ्यांचा वाहतूक कोंडीत मोठा वेळ जातो. त्यामुळे त्यांच्या कामावर मोठा परिणाम होतो. त्यासाठी येथील ग्रेडसेपरेटरची लांबी वाढवावी. त्यासाठीची निविदा प्रक्रिया तत्काळ राबवावी.

चिंचवडमधील पुलाचे आयुर्मान संपल्याचे रेल्वे विभागाने जाहीर केले आहे. त्यासाठी महापालिकेने तेथे सुरक्षा कठडे लावले आहेत. या पुलाच्या कामासाठीची निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरू करावी. निविदा प्रक्रिया पूर्ण झालेल्या ताथवडे, पुनावळे, रावेत, वाकड भागातील रस्त्यांची कामे सुरू करावीत अशी सूचनाही खासदार बारणे यांनी केली.

# रस्त्यांवर पथदिवे लावण्याचा महापालिकेला पडला विसर

## सातत्याने पाठपुरावा करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष : विशाल वाकडकर



**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड येथील रस्त्यांवर पथदिवे लावण्याचा महापालिका प्रशासनाला विसर पडलेला आहे की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते विशाल वाकडकर यांनी वारंवार पाठपुरावा केला असूनही याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे वाकडकर यांनी म्हटले आहे.

वाकड हिंजवडी नवीन लिंक रोड वरील रॉयल मिराज सोसायटीच्या बाजूस असणारा तीस मीटर रुंदीचा रस्ता तयार झाला असून पुढे हा रस्ता हिंजवडी कडे जातो आहे. सदरील रस्त्याचे पालिका हद्दीतील काम पूर्ण झाले असून या रस्त्यावर पालिकेकडून अद्याप दिवाबत्तीची सोय करण्यात आली नाही.

या रस्त्यावर पथदिवे लावण्यात यावे तसेच रस्त्याच्या बाजूस ओपन जिमचे साहित्य लावण्यात यावे यासाठी विशाल वाकडकर यांनी वारंवार पाठपुरावा केला आहे. सध्या या रस्त्याचा उपयोग सकाळी ज्येष्ठ नागरिक व्यायामासाठी करत आहेत. संध्याकाळी या भागात पथदिवे नसल्याने अनेक गैरप्रकार सुरू असतात. पदपथावर सध्या भटक्या लोकांनी अतिक्रमण केले आहे. वाकड आणि लगतचा भाग हा आयटीनगरीचा आहे, या रस्त्यावर पालिकेकडून अशाप्रकारे दुर्लक्ष करणे हे खूप नुकसानकारक आहे. महापालिका प्रशासनाने लवकरात लवकर या रस्त्यावर पथदिवे लावून त्याची वेळेवर देखभाल दुरुस्ती करावी अशी प्रामुख्याने मागणी केली आहे.

> पालिका प्रशासनाला सदरील रस्त्यावर पथदिवे लावण्यासाठी वारंवार पाठपुरावा करूनही ते दुर्लक्ष करत आहेत. येथे जे काही गैरप्रकार घडत आहेत यातून काही दुर्घटना घडल्यास त्याला पालिका प्रशासन जबाबदार असेल.
> **- विशाल वाकडकर, प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष.**

# मावळमध्ये भाजपकडून राष्ट्रवादीविरुद्ध छुपा प्रचार?

## अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांच्यासाठी गोळीबाराचा मुद्दा अडचणीचा

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ विधानसभा मतदारसंघात महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात चुरस असून, भाजपकडून 'राष्ट्रवादी'विरुद्ध छुपा प्रचार करण्यात येत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. पवना बंदिस्त जलवाहिनीच्या विरोधात झालेल्या आंदोलनावरील गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. हा गोळीबार तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसार झाला होता, असा छुपा प्रचार भाजपने सुरू केल्याने भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद उफाळून आला आहे.



पवना बंदिस्त जलवाहिनीच्या विरोधात झालेल्या आंदोलनावरील गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. त्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धारेवर धरणाऱ्या भाजपची अडचण झाली आहे. पवार हे महायुतीत आल्याने उघडपणे टीका करता येत नसल्याने भाजपने छुप्या पद्धतीने टीकेला सुरुवात केली आहे. मावळ भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळके असा राजकीय संघर्ष असला तरी त्याला निमित्त पवना बंदिस्त जलवाहिनी ठरताना दिसत आहे. त्यामुळे भाजपसोबत असूनही राष्ट्रवादीसाठी गोळीबाराचा मुद्दा डोकेदुखी आणि अडचणीचा ठरत आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता अतिरिक्त पाणी उपलब्ध करण्यासाठी केंद्र सरकारच्या जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण (जेएनएनयूआरएम) योजनेअंतर्गत महापालिकेने पवना धरणातून बंद जलवाहिनीद्वारे निगडी येथील सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत थेट पाणी आणण्याची योजना आखली. पवना जलवाहिनीच्या बाबतीत मावळवासीयांनी विरोधाची भूमिका घेतली असताना पोलीस बंदोबस्तात ९ ऑगस्ट २०११ रोजी भूसंपादन सुरू केले. त्याविरोधात भाजप-शिवसेनेसह शेतकऱ्यांनी आंदोलन केले. दगडफेक झाली. त्याला प्रत्युत्तर देताना पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. प्रकल्पाच्या विरोधातील वातावरण चिघळल्याने राज्य शासनाने १० ऑगस्ट २०११ रोजी या प्रकल्पाच्या कामाला स्थगिती दिली होती. तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसारच गोळीबार झाल्याचे आरोप भाजप-शिवसेनेच्या नेत्यांनी केले. पुढे यावरून राजकारण रंगले. राष्ट्रवादी काँग्रेस विरोधात नाराजी पसरली. ज्या पिंपरी-चिंचवडसाठी अजित पवार यांनी पवना बंदिस्त जलवाहिनीचा आग्रह धरला. या

### शेळके यांना भाजपसह स्वपक्षाचे आव्हान?

» भाजपचे माजी आमदार बाळा भेगडे हे निवडणुकीसाठी इच्छुक आहेत. 'आजपर्यंत पक्ष सांगेल तसे ऐकले, पण आता माघार नाही' असे फलक लावत भाजपचे मावळ निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांनीही माघार घेणार नसल्याचे संकेत दिले. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब भेगडे यांनी देखील निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. मतदारसंघात त्यांचे दौरे सुरू आहेत. त्यामुळे भाजपसह राष्ट्रवादीतूनही शेळके यांच्यासमोर आव्हान उभे राहणार असल्याचे दिसते.

शहरातूनही त्यांना साथ मिळाली नाही. महापालिकेतील सत्ता गेली. पुत्राचा मावळमधून पराभव झाला. भोसरी, चिंचवड मतदारसंघ गमवावा लागला. २०१४ मध्ये पिंपरी मतदारसंघही हातचा गेला होता.

जलवाहिनी प्रकल्प २०११ पासून बंद होता. महायुती सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर अजित पवार यांच्या पुढाकाराने या प्रकल्पाच्या कामाची स्थगिती ८ सप्टेंबर २०२३ रोजी राज्य शासनाने उठविली. त्याला वर्ष झाले. परंतु, अद्यापही काम सुरू झाले नाही. आता विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा गोळीबाराचा मुद्दा चर्चेत आला. गोळीबारावेळी भाजपमध्ये असलेले सुनील शेळके आता राष्ट्रवादीचे आमदार आहेत. शेळके आणि मावळ भाजपमध्ये कमालीचे वितुष्ट आहे. शेळके यांचा प्रचार न करण्याचा ठरावही मावळ भाजपने केला आहे. भाजपचे पदाधिकारी मावळमधील गावागावांमध्ये जाऊन अजित पवारांनी गोळीबार करायला लावला. शेतकऱ्यांना शहीद व्हावे लागले. त्या पक्षाला मदत करू नका, असा अपप्रचार करत आहेत. भाजपमधील कार्यकर्त्यांना भडकून दिले जात आहे. त्यांच्या मनात संभ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप शेळके यांनी केला. त्याला भाजपने अद्याप कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे भाजप सोबत असतानाही राष्ट्रवादीला पर्यायाने आमदार शेळके यांना गोळीबाराचा मुद्दा अडचणीचा झाला आहे.

---

# पुण्यात सात नवीन पोलीस ठाण्यांना मंजुरी

## आठवडाभरात कामकाजास सुरुवात : 60 कोटींच्या निधीला प्रशासकीय मान्यता

**पुणे | प्रतिनिधी**

शहराचा वाढता विस्तार, गुन्हेगारी, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न विचारात घेऊन गृह विभागाने पुणे शहरात सात नवीन पोलीस ठाण्यांना मंजुरी दिली. त्यासाठी ६० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. नवीन पोलीस ठाण्यांतील कामकाजासाठी ८१६ पोलीस कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आठवडाभरात सातही ठिकाणी कामकाजास सुरुवात होईल, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी सोमवारी दिली.

पुणे पोलिस आयुक्तालयात आंबेगाव, नांदेड सिटी, बाणेर, खराडी, वाघोली, काळेपडळ आणि फुरसुंगी ही नवीन पोलिस ठाणे सुरू होणार आहेत. त्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. नव्याने पोलिस ठाणे सुरू करण्यासाठी जागाही निश्चित करण्यात आली आहे. पोलीस ठाण्यांसाठी आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने प्राधान्य दिले आहे. वाढती लोकसंख्या, गुन्हेगारी, विस्तार विचारात घेऊन पुण्यात नवीन सात पोलीस ठाणी सुरू करण्यास मान्यता दिल्याने पोलीस ठाण्यांवर पडणारा कामकाजाचा ताण कमी होईल, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नमूद केले.




### नवरात्रोत्सवात कामकाजास सुरुवात

» नवीन पोलीस ठाण्यांच्या निर्मितीमुळे कामकाजाची विभागणी होईल, तसेच कायदा-सुव्यवस्था राखण्यास मदत होईल. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येणार आहे. दसऱ्यापूर्वीच नवीन पोलीस ठाण्यांचे कामकाज सुरू होईल. गेले तीन ते चार वर्षे नव्या पोलीस ठाण्यांसाठी पाठपुरावा करण्यात येत होता. बंडगार्डन पोलीस ठाण्यात नवीन इमारत बांधण्यात येणार असून, २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**पुण्यातील नवीन पोलीस ठाणी (कंसात उपलब्ध झालेला निधी)**

खराडी पोलीस ठाणे (सात कोटी ५० लाख)

फुरसुंगी पोलीस ठाणे (आठ कोटी ८१ लाख)

नांदेड सिटी पोलीस ठाणे (आठ कोटी ६० लाख)

वाघोली ठाणे ( आठ कोटी ७५ लाख)

बाणेर पोलीस ठाणे (आठ कोटी ६० लाख)

आंबेगाव पोलीस ठाणे ( सात कोटी ९ लाख)

काळेपडळ पोलीस ठाणे (दहा कोटी २४ लाख)

**शहरात नवीन तीन हजार सीसीटीव्ही कॅमेरे**

शहरात नवीन दोन हजार ८८६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. त्यासाठी ४३३ कोटी रुपयांच्या निधीलाही प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त अरविंद चावरिया, सहायक आयुक्त विवेक पवार यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी पाठपुरावा केला.

# पिंपरी-चिंचवड 'राष्ट्रवादी' फुटीच्या उंबरठ्यावर?

## भाजपचे काम करणार नसल्याचा इशारा देत चार माजी नगरसेवकांनी बंडखोरीचे संकेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांच्यासह बंडखोरीचा इशारा दिलेल्या मोरेश्वर भोंडवे, प्रशांत शितोळे, मयूर कलाटे, विनोद नढे या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या माजी नगरसेवकांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची सोमवारी पुण्यात भेट घेतली. चिंचवडमध्ये ज्याला उमेदवारी द्याल, त्याचे काम करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. त्यामुळे भोसरीनंतर चिंचवडमधील माजी नगरसेवकही पक्षांतराच्या तयारीत आहेत. त्यामुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेस फुटीच्या उंबरठ्यावर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.




महायुतीत 'ज्या पक्षाचा आमदार, त्या पक्षाला जागा' असे सूत्र ठरल्याचे सांगितले जाते. त्यामुळे भाजपचे विद्यमान आमदार असलेल्या भोसरी आणि चिंचवडमधील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. त्यातूनच राष्ट्रवादीचे तत्कालीन शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी भोसरीतील २० माजी नगरसेवकांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. लोकसभेला शिरुरमधून उमेदवारी नाकारल्यानंतर नाराज असलेले माजी आमदार विलास लांडे सातत्याने शरद पवार यांची भेट घेत आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघ महायुतीत राष्ट्रवादी काँग्रेसला मिळावा, जागा न मिळाल्यास भाजपचे काम करणार नसल्याचा इशारा देत चार माजी नगरसेवकांनी बंडखोरीचे संकेत दिले. त्यांनी भूमिका स्पष्ट करून चार दिवस झाले. तरी, पक्षाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या चार माजी नगरसेवकांनी माजी आमदार लांडे यांच्यासह पुण्यात शरद पवार यांची भेट घेतली.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाची परिस्थिती शरद पवार यांना सांगितली. आमचा विचार व्हावा. पण, तुम्ही जो उमेदवार द्याल, तो आम्हाला मान्य असेल. आमच्यासह भाजपमधील काही माजी नगरसेवक त्या उमेदवाराचा प्रचार करतील, अशी ग्वाही या माजी नगरसेवकांनी शरद पवार यांना दिल्याचे सूत्रांनी सांगितले. भोसरीतून विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रवी लांडगे यांनीही पवार यांची भेट घेतली. त्यांच्या भेटीचे नेमके कारण समजू शकलेले नाही.

राष्ट्रवादीत असलो तरी आता पर्याय शोधला पाहिजे. किती दिवस शांत राहणार आहे. चार दिवसांपूर्वी आम्ही भूमिका स्पष्ट केली होती. परंतु, पक्षाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. आम्ही चार माजी नगरसेवकांनी शरद पवार यांची भेट घेतल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक विनोद नढे यांनी सांगितले.

### भाऊसाहेब भोईर आज भूमिका स्पष्ट करणार

» चिंचवडमधून विधानसभा निवडणूक लढविण्यावर ठाम असलेले राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी आज (२ ऑक्टोबर) निर्धार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यातून ते पुढील भूमिका स्पष्ट करणार आहेत. भोईर अपक्ष निवडणूक रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.

# पालिकेच्या वतीने 'स्वच्छतेची पैठणी' कार्यक्रम

## महापालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' हे अभियान राबवण्यात येत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

महात्मा गांधीजी यांच्या जयंती निमित्त त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत महापालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' हे अभियान राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सांगवी येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर येथे महिला आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी 'स्वच्छतेची पैठणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.





स्वच्छतादुतांमुळे शहर स्वच्छ राहते. त्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य निरोगी व सुदृढ राहण्यास मदत होते. तसेच महिला स्वच्छता कर्मचारी देखील स्वतःचे घर उत्तमरित्या सांभाळून शहराच्या स्वच्छतेमध्ये आपले योगदान देत असतात. यावेळी आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सहाय्यक आरोग्याधिकारी सुधीर वाघमारे, शांताराम माने, अंकुश झिटे, के. पी. एम. जी. संस्थेचे विनायक पद्मणे यांच्यासह महिला आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे म्हणाले, 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा अंतर्गत महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाने शहरात स्वच्छतेचा संदेश नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहचवण्यास मदत होत असून पर्यावरणाचे संवर्धन करण्याबाबत जनजागृती देखील करण्यात येत आहे. तसेच सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छ सांस्कृतिक उत्सव आदी उपक्रमांचेही आयोजन करण्यात येत आहे. स्वच्छता कर्मचारी ३६५ दिवस शहराची स्वच्छता करत असतात. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मनावरील ताण कमी व्हावा तसेच दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त त्यांना विरंगुळा मिळावा यासाठी महापालिकेच्या वतीने अशा आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. स्वच्छता कर्मचारी महिलांनी या कार्यक्रमाचा मनसोक्त आणि निखळ आनंद घ्यावा हा महापालिकेचा उद्देश असल्याचे येळे यांनी सांगितले.

सूत्रसंचालक आर.जे. अक्षय यांनी स्वच्छतेची पैठणी या कार्यक्रमांतर्गत स्वच्छता कर्मचारी महिलांचे विविध खेळ घेऊन उपस्थित महिलांचे मनोरंजन केले. महिलांनी देखील या कार्यक्रमामध्ये उत्साहाने सहभाग घेऊन या कार्यक्रमाचा आनंद घेतला. मंगल जाधव ही महिला प्रथम क्रमांक पटकावत पैठणीची मानकरी ठरली. नेहा रंगवणे यांनी द्वितीय क्रमांक पटकावत सोन्याची नथ जिंकली तर सुशिला गायकवाड यांनी तृतीय क्रमांक मिळवून चांदीची जोडवी जिंकली.

# एकतानगरी येथील नदीपात्रात पुन्हा भराव

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांचा गौप्यस्फोट : उद्योग संघटनेकडून दुजोरा



**पुणे | प्रतिनिधी**

कर्वेनगर ते शिवणे, वारजे (म्हात्रे पूल ते राजाराम पूल) दरम्यानच्या नदीपात्रातील हरित पट्ट्यात भराव टाकून सुमारे चार ते पाच एकर आकाराचा भूखंड तयार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. त्यानंतर महापालिकेने तो राडारोडा काढून घेण्यास सुरुवात केली. काही दिवसात ही कारवाई बंद करण्यात आली. नागरिकांचा संताप कमी झाल्यानंतर तसेच हे प्रकरण शांत झाल्यानंतर पुन्हा एकतानगरी येथील नदीपात्रात राडारोडा टाकण्यास सुरुवात केल्याने नागरिक संतापले आहेत. हा सर्व प्रकार पालिकेच्या नाकावर टिच्चून सुरू असून अधिकाऱ्यांनी मात्र झोपेचे सोंग घेतल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

खडकवासला धरणातील ३५ हजार क्युसेक्स विसर्गामुळे सिंहगड रस्त्यासह नदीकाठच्या अनेक सोसायट्या, घरे, दुकानांमध्ये पाणी शिरले. नाले, रस्त्यांना नदीचे स्वरूप आले होते. पावसाच्या या हाहाकारामुळे सिंहगड रस्ता परिसरातारील विठ्ठलनगर, एकतानगरी, निंबजनगर, पाटील इस्टेट, शांतीनगर, तसेच, येरवडा, पुलाचीवाडी आदी भागात कंबरे इतके पाणी साचले होते. या परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. नदीकाठावरील परिसरात आपला जीव वाचवण्यासाठी सगळ्यांचीच धडपड सुरू होती. तब्बल ५ हजार नागरिकांचे स्थलांतर करावे लागले. विविध दुर्घटनांमध्ये ४ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर महापालिकेने कर्वेनगर ते शिवणे या भागातील नदीपात्राची पाहणी केली असता, सुमारे चार ते पाच एकर एवढ्या प्रमाणात मोकळी जागा निर्माण केल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात ही जागा १५ ते २० एकर असल्याचे बोलले जात आहे. या भरावामुळे नदीने पात्र सोडल्याने सिंहगड परिसरात पाणी शिरल्याचा आरोप केला होता. त्यामुळे हा भराव काढून घेण्याचे काम पालिकेने सुरू केले होते. पालिकेने ३०० ट्रक राडारोडा काढून घेतल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर पालिकेने अचानक कारवाई थांबवली होती. ही कारवाई मधेच राजकीय दबावापोटी थांबविण्यात आल्याची चर्चाही पालिकेत रंगली होती. या प्रकरणावरून लक्ष हटविण्यासाठी पालिकेने पुराचे कारण शोधण्यासाठी त्रिस्तरीय समिती नेमल्याचे जाहीर केल्याचा आरोप नागरिकांनी केला होता. समितीने चौकशी केल्यानंतर याचा अहवाल आल्यानंतर पुराचे कारण समोर येईल, असे सांगण्यात आले होते.

समितीकडून अहवाल सात दिवसात सादर होईल. समितीने सुचवलेल्या उपाययोजना आणि मुख्य कारणे यावरून महापालिका तत्काळ पावले उचलेल, असे सांगण्यात आले होते. परंतु समितीने अहवाल सादर केल्यानंतर हा चौकशी अहवाल धोरणात्मक नव्हता. आयुक्तांनी स्वत: समिती नेमली होती. त्यामुळे अहवाल जाहीर करण्याचा प्रश्न येत नाही, आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केले होते. अहवाल का लपवला जात आहे?, पुराची नेमकी कारणे काय आहेत?, पालिकेला काय उपाययोजना सुचवल्या आहेत?, असे प्रश्न नागरिकांनी उपस्थित केले होते. अहवाल बाहेर येणार नाही हे स्पष्ट होताच पुन्हा नदीपात्रात राडारोडा टाकला जात असल्याने पालिका आयुक्तांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करण्यात येत आहे.

नदीपात्रात काही भूमाफियांनी निर्माण केलेला भूखंड व्यावसायिक कारणासाठी होता असे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. नदीपात्रातील या राडारोड्यामुळे एक भिंतच तयार झाली आहे. तसेच राडारोड्यामुळे पाण्याचा फुगवटा होऊन शेजारील परिसरात पाणी शिरले आणि नागरिक पुरात सापडले असे प्रशासनाने सांगितले होते.

म्हात्रे पूल ते राजाराम पूल आणि कर्वेनगरमध्ये नदीपात्रालगत मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकामे आहेत. या पट्ट्यातील नदीपात्रात मोठमोठी हॉटेल, गॅरेज, मंगल कार्यालय, मोठे शेड उभारून धंदा तेजीत चालला आहे. या पट्ट्यातील बांधकाम बेकायदा आहे. त्याला महापालिकेची कोणतीही परवानगी नव्हती. त्यामुळे बांधकाम विभागाने सातत्याने नोटिसा दिल्या होत्या. तसेच कारवाईही करण्यात आली होती. आता पुन्हा महापालिकेला या विरोधात कडक धोरण राबवावे लागणार आहे.

### आयुक्तांचे दुर्लक्ष

» महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना एकतानगरीसमोरील नदीपात्रात पुन्हा भराव टाकल्याची कल्पना देण्यात आली. त्यावेळी त्यांनी लक्ष दिले नाही. त्यानंतर परिस्थितीचे भान राखत संबंधित अधिकाऱ्याकडे याची जबाबदारी असल्याचे सांगितले. मात्र या प्रकरणी कोणतीही प्रतिक्रिया दिलीच नाही. त्यामुळे नदीपात्रात भराव टाकून तयार होत असलेला भूखंड नेमका कोणाच्या घशात जाणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# पंतप्रधानांची सभा झालीच नाही; पण मैदानाची झाली दुर्दशा!

## सभेसाठी भव्य मंडप उभारण्याच्या कामामुळे स. प. महाविद्यालयाच्या मैदानाची दुर्दशा



**पुणे | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर मोठा मंडप उभारण्यात आला होता. पावसामुळे तो कार्यक्रम होऊ शकला नाही. मात्र मंडप उभारणीच्या कामामुळे महाविद्यालयाच्या मैदानाची दुर्दशा झाल्याचे स्पष्ट झाले असून, खेळांचा सराव करायचा कसा, असा प्रश्न खेळाडू विद्यार्थ्यांसमोर निर्माण झाला आहे.

पुणे मेट्रोच्या जिल्हा न्यायालय-स्वारगेट या मार्गाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २६ सप्टेंबर रोजी करण्यात येणार होते. मेट्रोच्या उद्घाटनासह विविध विकासकामांचे उद्घाटनही याच कार्यक्रमात करण्याचे नियोजन होते. या पार्श्वभूमीवर, स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर पंतप्रधानांची सभा होणार होती. त्यासाठी मोठा मंडप उभारण्यात आला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाद्वारे राजकीय शक्तीप्रदर्शन करण्याचाही प्रयत्न होता. मात्र, पावसामुळे हा नियोजित कार्यक्रम होऊ शकला नाही. रविवारी (२९ सप्टेंबर) दूरदृश्य प्रणालीद्वारे मेट्रोच्या उद्घाटनासह अन्य विकासकामांच्या उद्घाटनाचा कार्यक्रम करण्यात आला.

सभेसाठी भव्य मंडप उभारण्याच्या कामामुळे स. प. महाविद्यालयाच्या मैदानाची दुर्दशा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मंडप उभारणीसाठीचे साहित्य आणणाऱ्या ट्रकांच्या चाकांनी मैदानावरील माती उखडली गेली आहे. त्याशिवाय पंतप्रधान येणार असल्याने मैदानावर चक्क खडी टाकून मोठा रस्ता तयार करण्यात आला होता. त्यामुळे आता ही खडी मैदानावर पसरली आहे. मैदानावर मोठमोठे चर खणण्यात आले आहेत. त्यात पावसाचे पाणी साचले आहे.

मैदान खराब झाल्यामुळे फुटबॉल, क्रिकेट, कबड्डी, ॲथलेटिक्स अशा खेळांचा सराव करणाऱ्या खेळाडूंची मोठी गैरसोय झाली आहे. विद्यापीठाच्या स्पर्धांसह विविध स्पर्धांसाठीचा सराव करायचा कसा, असा प्रश्न खेळाडूंनी उपस्थित केला आहे.

शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक परिषद अध्यक्ष ॲड. एस. के. जैन म्हणाले, की सुरक्षिततेच्या कारणास्तव सभेसाठी मैदान उपलब्ध करून देण्याची विनंती जिल्हाधिकाऱ्यांनी केली होती. तसेच मैदान पूर्ववत करून देण्याच्या बोलीवरच महामेट्रोला मैदान देण्यात आले. त्यानुसार महामेट्रोने मैदान पूर्ववत करून देणे आवश्यक आहे. संस्थेच्या माध्यमातून मैदान सुधारणा करण्यात येणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया या पूर्वीच सुरू करण्यात येणार आहे.

मेट्रोच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी स. प. महाविद्यालयाचे मैदान घेतानाच ते पूर्वस्थितीत करून देण्याचे ठरले होते. त्यानुसार महामेट्रोकडून मैदान पूर्ववत करून देण्यात येणार आहे, असे महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी सांगितले.